**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १४ ब

## आणि मग भगवानांनी आणखी एक रामायणातील गोष्ट सांगितली:

चार बाळांना झोपवण्यासाठी चार पाळणे मागवले गेले. आणि प्रत्येक मुलाला पाळण्यामध्ये झोपवलं जाऊ लागलं. पण लक्ष्मण नेहमी दिवस-रात्र रडतच असायचा. माता सुमित्रा मुलाचं रडणं थांबवूच शकत नव्हती. राज्यातील कोणालाही हा प्रश्न सोडवता येत नव्हता. बाळ लक्ष्मण रडतच असायचा.

अखेर शेवटी गुरु वसिष्ठ आले आणि म्हणाले, ''हे पहा, लक्ष्मणाला रामापासून दूर राहायचे नाहीये. या मुलाला इथून उचलून राम ज्या पाळण्यात आहे त्याच पाळण्यात नेऊन ठेवा. तेव्हा त्यांनी बाळ लक्ष्मणाला, रामाचे जवळ पाळण्यात नेऊन ठेवले आणि बाळ लक्ष्मणाचे रडणे थांबले.

असं हे सुरुवातीपासूनच होतं. लक्ष्मण सावलीसारखा रामाच्या पाठीमागे असायचा. तसाच शत्रुघ्नदेखील भरताच्या जवळ सावलीसारखा त्याच्या मागे मागे असायचा. ते नेहमी एकत्रच राहिले. ही एक बंधुभावाची भावना होती. त्यांच्यात असे बंधुत्व होते.

## 'रामायणातील दुसरे दोन भाऊ'

भगवानांच्याकडून नेहमी उत्तरे मिळविण्यासाठी त्यांच्यापुढे प्रश्न मांडण्याचा माझा स्वभाव तुमच्या समजण्यात आलाच असेल. (हशा) बाबांनी दिलेली उत्तरे नेहमी सत्य आणि खात्रीचीच असत. आम्हाला त्यावर त्यांना प्रश्न विचारावे लागत नाहीत कारण ते अगदी थेट रामच आहेत. ते सध्याचे सत्यसाईबाबा म्हणून जन्म घेतलेले या युगातले रामच आहेत. ते कोणाही पेक्षा किंवा त्या त्या विषयातल्या पुस्तकापेक्षा अधिक चांगले आणि अधिक ज्ञानमार्गाने स्पष्ट करणारे आहेत.

मग मी म्हटलं, ''स्वामी, रामायणात अजून दोन भाऊ आहेत. एक आहे 'वाली' आणि 'दुसरा' 'सुग्रीव.' त्या दोघांच्यात बंधुप्रेम नव्हतं. जरी ते भाऊ-भाऊ होते तरी ते एकमेकांशी भांडत असत. स्वामी, तुम्ही नेहमी सांगत असता की राम, लक्ष्मण मित्रत्वाने, समजुतीने आणि बंधुत्वाने राहत होते. तुम्ही असंही सांगितलं आहे की कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी यांच्यातही प्रेमबंधन आणि नातं होतं. पण वाली आणि सुग्रीव यांच्यात कसलाही समजूतदारपणा, सलोखा नव्हता- त्यांच्यात नेहमी गैरसमजुतीच होत्या. (हशा) ते एकमेकांचे भाऊ असून परस्परांशी भांडतच असत. स्वामी, याचं स्पष्टीकरण तुम्ही कसं करू शकाल?

तेव्हा ते हसून म्हणाले, ''त्या दोघांमध्ये मारामारी नव्हती. (हशा) त्यांच्यात शत्रुत्व नव्हतं, त्यांच्यात केवळ गैरसमज होता.''

''ओह! असं होतं तर!'' (हशा) मग स्वामी, त्यांच्यात गैरसमज का होता?''

## ''भावाभावांमधील गैरसमज''

''मोठा भाऊ वाली याचा दुंदुभी नावाचा एक शत्रू होता. हा दुंदुभी नेहमी एका स्त्रीवरून वालीबरोबर भांडत असे.''

दुंदुभी हा वालीकडे आला आणि म्हणाला, ''चल, माझ्याबरोबर युद्ध कर. जर तुझ्यात धैर्य असेल तर!''

वाली हा योद्धा असल्यामुळे तो दुंदुभीचा पाठलाग करू लागला. दुंदुभी पुढे धावतोय आणि वाली त्याचा पाठलाग करतोय. अशा वेळी वालीने आपला धाकटा भाऊ सुग्रीवाला बोलावले व म्हटले, ''बंधो, मी हे राज्य सोडून जात आहे. माझ्या शत्रूशी लढण्यासाठी मी जात आहे. मी परत येईपर्यंत, तू या राज्याचा सर्वाधिकारी म्हणून राहा.''

पण सुग्रीवाला वाटले की त्याच्या मोठ्या भावाला– वालीला त्याची मदत हवी असेल म्हणून राज्यात राहण्याऐवजी सुग्रीवही वालीबरोबर दुंदुभीचा पाठलाग करू लागला. अशा तऱ्हेने दुंदुभी सर्वात पुढे, त्यानंतर वाली आणि शेवटी सुग्रीव असे पळत होते. शेवटी ते एका गुहेजवळ पोचले. दुंदुभी हा वालीकडून मारला जाऊ नये म्हणून त्या गुहेत लपला.

तेव्हा वालीने पाठीमागे वळून पाहिले आणि त्याने त्याच्या धाकट्या भावाला, सुग्रीवाला पाहिले. तो सुग्रीवाला म्हणाला, ''कृपया, माझ्यामागे येऊ नकोस. तू इथेच गुहेच्या दाराशी थांब. जर तू माझ्या पाठोपाठ आलास, आणि आपण दोघेही मारले गेलो, तर राज्य कोण चालवेल?'' अशा चांगल्या हेतूने त्याने त्याच्या धाकट्या भावाला गुहेच्या दाराशीच उभे राहण्यास सांगितले, आणि वालीने दुंदुभीचा पाठलाग केला. ते पळत होते, पळत होते. दिवसेंदिवस आणि आठवडे. अखेरीस वालीने दुंदुभीला पकडले व त्याचा वध केला. पराक्रमी व बलवान असल्याने, रक्त गुहेच्या बाहेर वाहू लागले.''

सुग्रीव प्रवेशद्वाराशीच असल्याने त्याला गुहेमधून वाहत येणारे रक्त दिसले. तेव्हा त्याला वाटले की युद्धामध्ये लढताना त्याचा भाऊदेखील मारला गेला असावा, म्हणून त्याने विचार केला की राज्यात परत जाऊन मोठा भाऊ वाली याच्या अनुपस्थितीत राज्य चालवावे. मोठ्या भावाच्या अनुपस्थितीत धाकट्या भावाने राज्य चालवून सेवा करावी. म्हणून त्याने एक मोठा खडक घेतला आणि त्याला दारासारखा वापर करून प्रवेश बंद केला. नंतर तो परत येऊन राज्यकारभार पाहू लागला.

मधल्या काळात गुहेच्या आतून बाहेर येण्यासाठी वाली बाहेर पडण्याचा मार्ग शोधत राहिला तेव्हा त्याला प्रवेश बंद करणारा मोठा खडक दिसला. त्याने एक लाथ मारताच तो खडक खाली पडला. मग तेथून तो पळत पळत त्याच्या राज्यात आला. त्याला त्याचा धाकटा भाऊ सुग्रीव, दोन्ही बाजूला बसलेल्या राण्यांबरोबर आनंद लुटत असताना दिसला.''

तेव्हा वालीला वाटले की सुग्रीवाला मीच मरावे असे वाटत असावे. त्याच्या मनात असा गैरसमज आला आणि त्याने रागाने अन् त्वेषाने त्याच्या छातीवर लाथ मारली.

सुग्रीव खाली पडला आणि रडू लागला. त्याने त्याची बाजू मांडायला सुरूवात केली. ''बंधू, माझा हेतू राज्य चालवण्याचा नव्हता. गुहेतून बाहेर येणारे रक्त पाहून मला वाटलं की तूच मरण पावलास. म्हणून मी राज्यचा अधिकार घेण्यासाठी येथे आलो. कृपा करून माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नकोस.''

पण त्याचा भाऊ म्हणाला, ''गप्प राहा. मला तुझा हेतू माहीत आहे.''

अशा प्रकारे हे शत्रुत्व आणि द्वेष सुरू झाला. खरं म्हणजे वाली आणि सुग्रीव भाऊ भाऊ असल्याने गैरसमज होईपर्यंत ते एकमेकांना खूप आवडत होते.''

बंधू–भगिनींनो, मी तुम्हाला एवढे सांगू शकतो की भगवान बाबा कुठल्याही भूमिकेला, चरित्राला कधीही सवंग बनवणार नाहीत. प्रत्येक भूमिकेमागचा काहीतरी संदेश सांगून प्रत्येक व्यक्तित्वाला ते उंचीवर नेतात, उदात्त करतात.

## ‘‘ध्रुवाची तपश्चर्या’’

मग मी बोलायला सुरवात केली. ‘‘स्वामी, किती सुंदर कथा आहे. स्वामी, मी ती यापूर्वी कधी ऐकलेली नाही. तुम्हाला धन्यवाद! खूप आभारी आहोत. पण....’’ (हशा)

‘‘हं! पण काय?’’

‘‘स्वामी, मी ध्रुव नावाच्या एका मुलाविषयी ऐकलेलं आहे. या मुलाचं त्याच्या भावाबरोबर फारसं जुळत नसे. त्याची भावाबरोबर नेहमी लढाईच चालू असायची. तुम्ही म्हणता की या कथा, बंधुभाव आणि आदर्शांविषयी सांगतात. तुम्ही ध्रुव आणि त्याच्या भावामधील नात्याविषयी काय सांगाल?’’

तेव्हा बाबांनी सगळी गोष्ट सांगायला सुरुवात केली.

‘‘उत्तानपाद नावाच्या राजाला ध्रुव नावाचा एक मुलगा होता. त्या राजा उत्तानपादाला दोन राण्या होत्या. एक सुरुची, दुसरी सुनीती. सुरुचीला उत्तम नावाचा मुलगा होता. सुनीतीला ध्रुव नावाचा मुलगा होता. पण राजा उत्तानपादाला सुरुची जास्त आवडत होती आणि सुनीती नव्हती– इथे मित्रांनो, मी तुम्हाला सांगावयास हवं की सुरुची आणि सुनीती ही गर्भितार्थ असलेली नावे आहेत. सुरूची म्हणजे जो अनुकूल आणि प्रेमळ असतो. सुनीती म्हणजे जो नीतीमान असतो. ही नावंसुद्धा काही सूचक असतात. प्रत्येक नावातून काहीतरी स्पष्टीकरण होते.

‘‘आता, एक दिवस उत्तानपाद राजा सिंहासनावर बसला असताना त्याच्या दुसऱ्या पत्नीचा, सुरुचीचा मुलगा आला आणि राजाच्या मांडीवर बसला. हे ध्रुवाच्या म्हणजे पहिल्या पत्नीच्या, सुनीतीच्या मुलाने पाहिलं होतं.

ध्रुवालासुद्धा पित्याच्या मांडीवर बसायचे होते. म्हणून तो त्याच्याकडे धावत आला. पण सावत्र आई सुरुचीला हे आवडलं नाही. तिने ध्रुवाला पित्यापासून दूर ओढले आणि ओरडली, ‘‘तुला पित्याच्या मांडीवर बसण्याचा अधिकार नाही. इथून बाहेर जा!’’

ध्रुव खूप दु:खी झाला आणि आईला म्हणाला, ‘‘आई, दुसऱ्या भावाप्रमाणे वडिलांच्या मांडीवर बसण्याची मला परवानगी नाही. मी काय करू?’’

आईसुद्धा रडतच म्हणाली, ‘‘इथे दुसरा पर्यायच नाही. मी तुला मदत करू शकत नाही.’’ असं ती म्हणाली.

तेव्हा ध्रुवाने परमेश्वराला प्रसन्न करून वडिलांच्या मांडीवर बसण्याचा अधिकार मिळविण्यासाठी काहीतरी तपश्चर्या करण्याचे ठरविले. वनामध्ये जात असताना त्याला नारद नावाचा साधुपुरुष भेटला.’’

नारद म्हणाले, ‘‘अरे बाळा, तू कोठे जात आहेस?’’

तो म्हणाला, ‘‘हे मुनीवर्य, तुम्हाला माझे नम्र प्रणाम! मी घनदाट जंगलात तपश्चर्या करण्यासाठी जात आहे. मला परमेश्वराला प्रसन्न करून घेऊन मला माझ्या वडिलांच्या मांडीवर बसण्याची माझी इच्छा पूर्ण करावी.’’

नारदाला त्याची दया आली आणि त्याला पुन्हा पुन्हा म्हणण्यासाठी एक मंत्र दिला. त्याचा (देवाच्या नावाचा) जप करण्यास सांगितला.

त्याप्रमाणे ध्रुवबाळ, घनदाट अरण्यात त्या मंत्राचा जप करत करत तो जंगलात पोचला. परमेश्वराने साक्षात् प्रकट होऊन, त्याला दर्शन दिले आणि विचारले, ‘‘मुला, तुला काय पाहिजे?’’

हा मुलगा, ध्रुव म्हणाला, ‘‘मला मुक्ती हवी आहे.’’ (हशा)

तेव्हा देव म्हणाला, ‘‘नाही, नाही. तू मनापासून आपल्या वडिलांच्या मांडीवर बसण्याचा अधिकार मिळविण्यासाठी तपश्चर्या करायला लागलास. तीच तुझी मूळ इच्छा होती. आता तू मुक्ती मागत आहेस. तू

चुकत आहेस. तू तसं करू नकोस. तसंच तुझ्याजवळ मुक्ती मिळविण्यासाठी खूप वेळ आहे. तू अजून लहान आहेस. तू विवाह करून राज्यकारभार कर आणि जेव्हा तू हे शरीर सोडशील तेव्हा तुला मुक्ती मिळेल. तू आकाशात कायमचा स्थिर 'तारा' म्हणून राहशील.''

आजदेखील माणसं 'ध्रुवाचा तारा' म्हणून उदाहरण देतात. हा तारा इतर ताऱ्यांपेक्षा जास्त चमकत असतो.''

त्या दिवशी भगवानांनी हे असं सांगितलं.

***